# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.03.2026** **वारः गुरुवार**

---

1. भारत दौऱ्यावर आलेले फीनलंडचे राष्ट्रपती अलेक्झांडर स्टब आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात आज नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा होणार
2. इराण, इस्त्राइल आणि अमेरिकेच्या दरम्यानचा संघर्ष तीव्र, भारतीयांसाठी परराष्ट्र मंत्रालयातर्फे नवी दिल्लीत विशेष नियंत्रण कक्ष स्थापन
3. नेपाळमध्ये आज संसदीय निवडणुकीसाठी मतदान
4. राज्यसभेच्या 37 जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करायचा आजचा शेवटचा दिवस
5. आणि
6. टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेत न्यूझीलंड अंतिम फेरीत दाखल; आज भारत आणि इंग्लंड यांच्यात उपांत्य सामना

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फीनलंडचे राष्ट्रपती अलेक्झांडर स्टब यांच्यात आज नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा होणार आहे. यावेळी दोन्ही देशादरम्यान विविध क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढवण्या संदर्भात दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा होण्याची शक्यता आहे. तसच बहुदेशीय जागतिक मंचाच्या माध्यमातून सहकार्य आणि अनेक क्षेत्रीय तसच आंतरराष्ट्रीय मुद्यांवर ही यावेळी चर्चा होण्याची शक्यता आहे. यानंतर दोन्ही देशांच्या दरम्यान अनेक करारांवर हस्ताक्षरही होण्याचीही अपेक्षा आहे. त्यानंतर आज दुपारी पंतप्रधान मोदी फीनलंडच्या राष्ट्रपतींच्या सन्मानार्थ भोजन देणार आहेत. दरम्यान, फीनलंडचे राष्ट्रपती अलेक्झांडर स्टब चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले असून, काल त्यांच नवी दिल्ली विमानतळावर परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह यांनी स्वागत केल. या दौऱ्यादरम्यान फीनलंडचे राष्ट्रपती अलेक्झांडर स्टब मुंबईलाही भेट देणार आहेत.

**<u>युद्ध</u>**

इराण, इस्त्राइल आणि अमेरिकेच्या दरम्यानचा पश्चिम आशियातील संघर्ष आता जास्त तीव्र झाला असून हे तिन्ही देश विविध आखाती देशांमधील एकमेकांच्या महत्वाच्या केंद्रावर क्षेपणास्त्र हल्ले करत आहेत. काल श्रीलंकेच्या दक्षिण किनाऱ्याजवळ खोल समुद्रात अमेरिकी पाणबुडीने आयरीस देना या इराणी नौदलाच्या जहाजावर केलेल्या हल्ल्यात 78 जण जखमी झाले तर 101 जण बेपत्ता असल्याच वृत्त आहे. यात 80 मृतदेह ताब्यात मिळाल्याची माहिती देण्यात आली. या हल्ल्यात इराणी जहाज बुडाल असून, श्रीलंकेच्या नौदलाने अनेक इराणी नौदल कर्मचाऱ्यांना वाचवलं आहे. त्यापैकी 32 जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. हे इराणी जहाज विशाखापट्टणम इथ आयोजित आंतरराष्ट्रीय समिट 2026 मध्ये भाग घेऊन पुन्हा स्वदेशी परतत होतं.

दरम्यान, अमेरिकेच्या ऑपरेशन एपिक फ्यूरीबद्दल माहिती देताना अमेरिकी कमांडर ब्रेड कुपर यांनी सांगितल की युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या 100 तासा पेक्षा कमी वेळात 2 हजार ठिकाणी 2 हजारांपेक्षा जास्त शस्त्रांचा वापर करून इराण च मोठ नुकसान करण्यात आल आहे. यामध्ये त्यांच्या वायु सुरक्षा प्राणलीच मोठ नुकसान जाल असून त्यांची अनेक क्षेपणास्त्र आणि ड्रोन पाडण्यात अमेरिकेला यश आल आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वतीने जारी केलेल्या निवेदनात म्हंटल आहे की या युद्धमुळे 28 फेब्रुवारी आणि 1 मार्च या दोन दिवसांत तेहरान मधून 1 लाखापेक्षा जास्त नागरिकांनी स्थलांतर केल आहे. या युद्धात आता पर्यंत इराण मधील 1 हजारांपेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहिती अमेरिका स्थित मानवाधिकार कार्यकर्ता वृत्तसंस्थेने दिली आहे.

**<u>नियंत्रण कक्ष</u>**

पश्चिम आशियामधील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, परराष्ट्र मंत्रालयाने नवी दिल्लीत विशेष नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. सकाळी 9 ते रात्री 9 या कालावधीत नागरिकांना या  नियंत्रण कक्षाशी दूरध्वनी द्वारे संपर्क साधता येईल. त्यासाठी जारी केलेले दूरध्वनी क्रमांक असे-18-00-11-87-97, अथवा 011-23-01-21-13, 011-23-01-41-04 आणि 011-23-01-79-05 या व्यतिरिक्त आखतातील विविध देशात भारतीय दूतावासाने तिथ अडकलेल्या भारतीय नागरिकांसाठी आणि त्यांच्या सुरक्षेसाठी 24 तास हेल्प लाइन सुरू केली आहे.

दरम्यान, संघर्षग्रस्त पश्चिम आशियात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी राज्य सरकारनंही यंत्रणा सज्ज केल्या आहेत. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी काल संबंधित अधिकाऱ्यांकडून परिस्थितीचा आढावा घेतला. आखाती देशांमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांची अचूक माहिती मिळावी, यासाठी शासनाने 'सहाय्यता गल्फ' हे विशेष ऑनलाइन पोर्टल विकसित केलं आहे. या पोर्टलवर संबंधित नागरिकांनी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी आवश्यक माहिती भरावी, असं आवाहन महाजन यांनी केलं आहे.

**<u>मुख्यमंत्री</u>**

दरम्यान, संघर्षग्रस्त भागात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना सुखरूप मायदेशी आणलं जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत दिलं. पश्चिम आशियामध्ये अडकलेल्या भारतीयांना परत आणण्याचं काम केंद्र सरकार करत असून राज्य सरकार सातत्यानं पाठपुरावा करत आहे असं ते म्हणाले. देशात सुमारे दोन महिन्यांचा तेलसाठा उपलब्ध असल्यानं तातडीनं इंधन दरवाढीची भीती नसल्याचं ते म्हणाले.

**<u>एअर इंडिया परतावा</u>**

पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रवास रद्द करावा लागलेल्या प्रवाशांना प्रवासाची तारीख बदलण्याचा किंवा तिकीटाचे पूर्ण पैसे परत घेण्याचा पर्याय एअर इंडियानं उपलब्ध करुन दिला आहे. पश्चिम आशियासह युनायटेड किंग्डम आणि युरोपला जाणाऱ्या किंवा तिथून भारतात येणाऱ्या 10 मार्चपर्यंतच्या एअर इंडिया कंपनीच्या विमानांसाठी हा पर्याय उपलब्ध असेल. मात्र यासाठी तिकीटाचं आरक्षण 28 फेब्रुवारीआधी निश्चित केलेलं असणं आवश्यक आहे. विमानांच्या उड्डाणांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी प्रवाशांनी कंपनीच्या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा मदत क्रमांकाशी संपर्क साधावा असा सल्ला प्रवाशांना देण्यात आला आहे.

**<u>एअर इंडिया सूचना</u>**

पश्चिम आशियातील संघर्षाची स्थिती आणि वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर एअर इंडिया कंपनीनं टोरांटो, फ्रँकफर्ट आणि पॅरीससाठी विमानांच्या उड्डाणांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आजपासून 11 मार्चपर्यंत दिल्ली ते टोरांटो, दिल्ली ते फ्रँकफर्ट प्रत्येकी 3 आणि दिल्ली ते पॅरीस एक जास्तीचं विमानउड्डाण नियोजित केल्याची माहिती कंपनीनं दिली आहे.

**<u>अमेरिका सिनेट</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इराणविरुद्ध लष्करी कारवाई करण्याच्या निर्णयाला अमेरिकेच्या सिनेटनं पाठिंबा दर्शवला आहे. लष्करी कारवाई थांबवण्याबाबतच्या प्रस्ताव 53 विरुद्ध 47 मतांनी फेटाळण्यात आला.

**<u>नेपाळ मतदान</u>**

नेपाळमध्ये आज संसदीय निवडणुकीसाठी मतदान होत आहे. नेपाळच्या संसदेतील सदस्यांची एकूण संख्या 275 असून यातील 165 सदस्यांची निवड थेट मतदानाद्वारे होते तर 110 सदस्य प्रतिनिधित्वाच्या प्रमाणानुसार निवडले जातात. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या युवा आंदोलनानंतर नेपाळमध्ये ही पहिली निवडणूक होत आहे. नेपाळमध्ये कम्युनिस्ट

पक्ष आणि नेपाळी काँग्रेस हे प्रमुख राजकीय पक्ष असले तरी तीन वर्षांपूर्वी स्थापन झालेला राष्ट्रीय स्वतंत्र पक्ष आघाडीवर असल्याचं राजकीय विश्लेषकांचं मत आहे.

**राज्यसभा निवडणूक**

देशातल्या 10 राज्यातील राज्यसभेच्या 37 जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करायचा आजचा शेवटचा दिवस आहे. उमेदवारी अर्जांची छाननी उद्या होणार असून 9 मार्च पर्यंत हे अर्ज मागे घेता येतील. राज्यसभेच्या या 37 जागांसाठी येत्या 16 मार्चला मतदान होणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर करण्यात येणार आहेत.

**राज्यसभा**

दरम्यान, राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी महाराष्ट्रातल्या जागांकरिता भारतीय जनता पक्षानं 4 उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपा नेते विनोद तावडे, यांच्या खेरीज नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपात आलेले रामराव वडकुते या दोन नवीन चेहऱ्यांचा त्यात समावेश आहे. महाविकास आघाडीकडून ज्येष्ठ नेते शरद पवार यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**क्रिकेट**

टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेत न्यूझीलंडनं काल कोलकाता इथं दक्षिण आफ्रिकेवर 9 गडी राखून विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या 8 बाद 169 धावा झाल्या. न्यूझीलंडनं केवळ एक गडी गमावून तेराव्या षटकातचं हे लक्ष्य गाठलं. फिन ऍलेननं नाबाद शंभर धावा फटकावल्या. स्पर्धेचा दुसरा उपांत्य सामना आज भारत आणि इंग्लंड दरम्यान मुंबईत वानखेडे मैदानावर संध्याकाळी सात वाजल्यापासून सुरु होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.